# झोपलेल्या जाती जागे झाल्यास, सरकारची झोप उडेल

..... आमदार हरिभाऊ राठोड

देशामध्ये बंजारा भटक्या विमुक्त समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न जटील झालेला आहे. विशेषत: बंजारा व धनगर समाजाला काही राज्यांमध्ये एस.सी.तर काही राज्यांमध्ये एस.टी.चे आरक्षण देण्यात आले आहे आणि समाजाची मागणी एस.टी. समाजाच्या सूचीमध्ये घालावे अशी आहे. मागील अनुभव असा आहे की, बंजारा समाजातील पूर्वीच्या बुजूर्ग नेत्यांनी जे अपार प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांमुळे श्रीमती इंदिराजी गांधी यांनी १९६७ मध्ये तसेच १९७२ मध्ये संसदेमध्ये बील आणले होते. त्या वेळेस संसदेतील काही मुळात आदिवासी असलेल्या खासदारांनी या बीलाला विरोध केला व बंजारा समाजाला आदिवासींचा दर्जा देण्याबाबतचे बील संयुक्त समितीकडे (JPC) पाठविण्यात आले. संयुक्त समितीने देशभर दौरा करून सरकारला अहवाल सादर केला. धनगर आणि बंजारा हा समाज अनुसूचित जमातीसाठी असलेला निकष पूर्ण करीत आहे व त्यामुळे या समाजाला अनुसूचित जमातीमध्ये सवलती देण्यास हरकत नसावी. सदर बील पुन:श्च विचारार्थ संसदेमध्ये ठेवावे हा विचार होऊन १९७६ साली अंतिमत: हे बील लोकसभेत सादर झाले आणि ज्या दिवशी सदर बील चर्चेसाठी येणार होते त्याच्या आदल्या दिवशी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांना लोकसभेतील ४२ आदिवासी समाजाचे खासदार भेटले आणि या बीलास कडा विरोध केला व त्यामुळे दुर्दैवाने बंजारा आणि धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये देण्याबाबतचे बील मागे घेण्यात आले.

वरील हा सर्व इतिहास बघितल्यानंतर या गोष्टींची खात्री झाली की, जेव्हां काँग्रेसकडे ४१५ खासदार होते, काँग्रेस देशामध्ये मजबूत होती आणि "इंदिराजी बोले आणि देश डोले" "Indira is India" अशी परिस्थिती असतांना सुध्दा हे बील पास होऊ शकले नाही तर हे कदापी पास होणार नाही अशी आमची धारणा झाली. आणि म्हणून काय करता येऊ शकेल की ज्यामुळे या समाजाला केंद्रीय आरक्षणाचा फायदा मिळू शकेल याचा विचार आणि अभ्यास करतांना काही गोष्टी समोर आल्या आणि त्या म्हणजे महाराष्ट्रामध्ये आणि आंध्र प्रदेशामध्ये भटक्या आणि विमुक्त यामध्ये बंजारा समाजाचा देखील समावेश होतो त्यांना वेगळे आरक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न झाला. आणि तो यशस्वी झाला. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतांना समाजासाठी अनेक कल्याणकारी योजना, स्कॉलरशिप देण्यात येऊन

समाजाची प्रगती झाली. हाच धागा पकडून देशभर असेच आरक्षण मिळावे यासाठी मा.गोपीनाथजी मुंडे, प्रमोदजी महाजन यांच्या माध्यमातून मा.अटलबिहारी वाजपेयी आणि मा.लालकृष्ण अडवाणीजी यांच्याकडे सदर प्रस्ताव ठेवण्यात आला आणि त्यावेळेस या सर्व नेते मंडळींनी या गोष्टीला तत्वत: मान्यता दिली, आणि धनगर समाजाच्या पंढरपूर येथील महामेळाव्यामध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी दिनांक २० जानेवारी, २००४ रोजी आयोग स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला.

या आयोगाचे अध्यक्ष म्हणून न्यायमूर्ती बी. मोतीलाल नायक यांना तर हरिभाऊ राठोड यांना त्या आयोगाचे सदस्य बनविण्यात आले. परंतु २००४ च्या एप्रिलमध्ये सार्वत्रिक निवडणूका घोषित झाल्या आणि भाजपचे सरकार जाऊन काँग्रेसचे सरकार आले आणि योगायोगाने मी खासदार झालो. बी.मोतीलाल नायक यांनी या पदाचा राजीनामा दिला व तो आयोग संपुष्टात आला. मी खासदार झाल्यानंतर लोकसभेमध्ये शेकडो वेळा हा प्रश्न उपस्थित करून परत आयोग सरकारने बसवावा अशी सरकारला विनंती केली.

त्याच काळामध्ये अखिल भारतीय सेवासंघाचे रणजित नाईक, प्रसिध्द लेखिका महाश्वेतादेवी, उचल्याकार लक्ष्मण गायकवाड, गोपीनाथजी मुंडे आणि हजारो इतर कार्यकर्ते यांच्या अथक प्रयत्नातून पुन्हा बालकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला. २००८ मध्ये या आयोगाने आपला अहवाल सादर केला. परंतु सरकारकडे लोकसंख्या नसल्यामुळे हा आयोग त्यावेळेस लागू करता आला नाही. लोकसंख्येशिवाय आरक्षणाची टक्केवारी ठरविता येणार नाही, म्हणून सरकारने सर्व समाजाची जनगणना करावी अशी आम्ही मागणी केली. श्रीमती सोनियाजी गांधी यांनी हा प्रश्न नॅशनल ॲडव्हायझरी कौन्सिलमध्ये विचारार्थ ठेवून २०११ साली सर्व समाजाची देशभर जनगणना करण्यात आली आणि ती आज सरकारकडे उपलब्ध आहे.

यापूर्वी मंडल आयोगाचे सदस्य एल.आर.नाईक यांची डिसेन्ट नोट, सर्वोच्च न्यायालयाने "इन्द्रा शहाणी विरूध्द भारत सरकार" तथा अलिकडेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ईश्वरय्या या तिघांचाही अहवाल आणि शिफारशी बघता मला विश्वास वाटतो की, महाराष्ट्र राज्याने ज्याप्रमाणे आरक्षण दिले तसे आरक्षण आता देशभर लागू होण्यामध्ये काही अडचण नाही.

## एल.आर.नाईक यांनी डिसेंन्ट नोटमध्ये मांडलेले मत–

श्री.नाईक यांचे असे मत होते की, २७ टक्के आरक्षण सरसकट न देता राज्यांच्या या मागासवर्गीयाच्या यादीचे विभाजन करावे. एक मागासवर्गीय व दूसरे दबले गेलेले मागासवर्गीय म्हणजेच प्रगत मागासवर्गीयाच्या तुलनेत अत्यंत मागासलेले वर्ग, त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते की, ओबीसी मधील पुढारलेल्या जाती ओबीसी मधीलच मागे पडलेल्या जातींना पुढे येऊ देत नाहीत. त्यामुळे भविष्यात हे अत्यंत मागासलेल्या व अत्यंत टोकाच्या मागासलेल्या जाती संघटीत होतील व आपले नेतृत्व आपणच निर्माण करतील. परंतु जर असे झाले नाही तर ओबीसीमधील अत्यंत मागासलेला वर्ग व विमुक्त भटक्या जाती व दबलेले मागासवर्ग केंद्रीय आरक्षणाचा लाभ उठवू शकणार नाहीत.

## मा. सर्वोच्च न्यायालयाचे मत

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार २७ टक्के आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा शहाणी विरूध्द भारत सरकार या खटल्यामध्ये असे म्हटले आहे की, घटनेच्या कलम १६ (४) या तरतुदीप्रमाणे मागासवर्गीयांचे मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे वर्गीकरण करण्यात घटनेचा कोणताही अडथळा नाही असे वर्गीकरण हे सामाजिकदृष्टया किती मागासलेपण आहे त्यावर अवलंबून असावे. विविध मागासवर्गीय यामध्ये समान वाटप होणे हे आवश्यक आहे की, ज्यायोगे एकत्रीकरण होऊन एक वा दोन वर्ग आरक्षणाचा सर्व वाटा स्वत:च घेऊन जाणार नाही.

सदर खटल्याच्या निकालाच्या ८०२ या परिच्छेदाप्रमाणे माननीय न्यायधिशांनी असे मत व्यक्त केले की, मागासवर्गीयांचे, मागासवर्गीय व अधिक मागासवर्गीय असे दोन किंवा तीन गट करण्यास घटनेचा किंवा कायद्याचा कोणताही अडथळा नाही. असे वर्गीकरण केलेच पाहीजे असा आग्रह ते धरत नाहीत. मात्र प्रश्नाचे उत्तर देतांना ते इतकेच म्हणतात की, असे वर्गीकरण केल्यास ते वैध होईल. माननीय न्यायाधिशांनी दोन व्यावसायिक गटांचे उदाहरण दिले आहे. सोनार व वडार (पारंपारिकरित्या दगड फोडणारा) जर या दोघंनाही एकाच वर्गात घातले तर सोनारच सर्व सवलती लाटतील व वडारांना काहीच राहणार नाही. त्यामुळे शक्य असल्यास राज्य सरकारने इतर मागासवर्गीयांमध्ये सुध्दा वर्गीकरण करावे की, ज्यामुळे मागासवर्गीयांतील अधिक मागासवर्गीयांनाही त्यांचा देय असलेले लाभ मिळतील.

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग, दिल्ली यांनी केलेल्या शिफारशी

नुकतेच राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने अत्यंत महत्वपूर्ण शिफारस केली आहे. एल.आर.नाईक आणि मा.सर्वोच्च न्यायालय यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी ओबीसीचे विभाजन करून (१) भटक्या विमुक्त, (२) बारा बलुतेदार (न्हावी, खाटीक, वाणी, लोहार, सुतार, सोनार, शिंपी, धोबी) आणि (तेली, माळी, कोळी, गोवारी, धनगर) आणि (३) केंद्रीय सूचीमधील उरलेले इतर मागसवर्ग. असे विभाजन २७ टक्के आरक्षणाचे करावे अशी शिफारस केली आहे. आणि गेले २० वर्ष आमची विभाजनाची तीच मागणी आहे.

वरीलप्रमाणे केंद्र सरकारने जर निर्णय घेतला तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात जसे अ, ब, क अशी वर्गवारी करून वेगळे आरक्षण दिले आणि सामाजिक न्याय दिला तसाच न्याय या सर्व समाज घटकांना मिळणार आहे. ९:९:९ टक्के वर्गवारी करण्याचा निर्णय झाल्यास या दशकातील सर्वात मोठा सामाजिक न्यायाचा प्रश्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षी सुटेल अशी आशा आहे. कारण देशभरातील ६६६ भटके विमुक्त (अंदाजे २२ करोड) आणि ५४० अत्यंतीक मागास जाती (अंदाजीत १८ करोड) असे एकूण ४० करोड लोकांचा हा प्रश्न आहे. यासाठी २७ मार्च २०१६ रोजी जंतरमंतर, दिल्ली येथे महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या झोपलेल्या जाती जाग्या झाल्यास सरकारची झोप उडाल्याशिवाय राहणार नाही असा मला विश्वास वाटतो.

मा.श्रीमती जयश्रीजी खाडिलकर
मुख्य संपादक, नवाकाळ

कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी दयावी.

धन्यवाद !

आपला,

- हरिभाऊ राठोड -
माजी खासदार तथा आमदार